# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.06.2024** **वारःशनिवार**

---

1. राज्य विधीमंडळाचं पावसाळी अधिवेशन 27 जून ते 12 जुलै दरम्यान, 28 जून रोजी अर्थसंकल्प
2. आषाढी पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधांचं नियोजन करण्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निर्देश
3. साखरेच्या किमान विक्री दरात वाढ करण्याची राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाची मागणी आणि
4. 18व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला आजपासून सुरुवात; पुण्यातही होणार चित्रपटांचं प्रदर्शन

**अधिवेशन**

राज्य विधिमंडळाचं पावसाळी अधिवेशन येत्या 27 जून ते 12 जुलै या कालावधीत मुंबईत होणार आहे. राज्याचा अतिरिक्त अर्थसंकल्प 28 जून रोजी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात येणार आहे. विधानभवनात काल विधानसभा आणि विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत अधिवेशनाच्या कामकाजाबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीला विधानसभा अध्यक्ष ॲड.राहुल नार्वेकर, विधान परिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह कामकाज सल्लागार समितीचे सदस्य, उपस्थित होते.

**अजित पवार**

आषाढी पालखी सोहळ्या दरम्यान वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधांचं नियोजन करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. पालखी सोहळ्याच्या पूर्वतयारीसाठी काल पुण्यात झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. सोहळ्यासाठी शासनातर्फे आवश्यक निधी देण्यात येईल अशी ग्वाहीदेखील त्यांनी दिली. थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यातल्या भिडेवाडा इथल्या स्मारका संदर्भातली निविदा प्रक्रिया गतीने राबवावी असे निर्देशही अजित पवार यांनी काल पुण्यात झालेल्या बैठकीत दिले. हे स्मारक चार मजल्यांचं करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. याठिकाणी सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, त्यांच्या जीवनातील प्रसंग, कार्याची माहिती दृकश्राव्य स्वरुपात दर्शविण्याची यंत्रणा तसंच मुली आणि महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था अशी व्यवस्था करण्यात यावी असे निर्देश मंत्री छगन भुजबळ यांनी दिले. आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या पुण्यात उभारण्यात येत असलेल्या स्मारकाच्या कामाचाही काल अजित पवार यांनी आढावा घेतला.

**चारा डेपो**

राज्यातल्या अनेक भागात पावसाचं आगमन झालं असलं तरी अनेक विभागात अजूनही पावसाचं प्रमाण समाधानकारक नाही; त्यामुळे 1 हजार 245 महसुली मंडळात चारा डेपो उभारण्याला शासनाने परवानगी दिली आहे. महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी काल ही माहिती दिली. सध्या राज्यात सुमारे 512 लाख मेट्रिक टन हिरवा चारा तर सुमारे 144 लाख मेट्रिक टन सुका चारा उपलब्ध आहे.

**मोहोळ**

नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांची, पुण्याशी निगडित महत्त्वाच्या प्रश्नांसंदर्भात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासमवेत काल बैठक झाली. लोहगाव विमानतळावरील नवे टर्मिनल कार्यान्वित करणे, अपघातग्रस्त विमान

'बे'वरून हलवणे आणि राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाचा निधी पुणे महापालिकेला मिळवून देण्यासंदर्भात यावेळी सविस्तर चर्चा झाली. नवे टर्मिनल लवकर सुरू करून पुणेकर प्रवाशांना दिलासा देण्याचा प्रयत्न असल्याचं मोहोळ यांनी सांगितलं.

**<u>हर्षवर्धन पाटील</u>**

साखर कारखान्यांकडून घेतल्या जाणाऱ्या घाऊक साखरेच्या, किमान विक्री दरात 31 वरून 42 रुपये प्रतिकिलो पर्यंत वाढ करण्याची मागणी राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघानं केंद्र सरकारकडे केली आहे. महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. साखर उद्योगासंदर्भात महासंघाच्या बैठकीनंतर पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. गेल्या काही वर्षांपासून उसाच्या एफआरपीमध्ये सातत्यानं वाढ केली जात आहे; मात्र त्या तुलनेत साखरेची किमान विक्री किंमत कायम आहे. त्यामुळे साखर कारखान्यांचं आणि पर्यायानं ऊस उत्पादक शेतकऱ्यांचंही नुकसान होत आहे, असं पाटील म्हणाले. साखर उद्योगाच्या वाटचालीशी संबंधित आगामी 10 वर्षांचा व्यापक आराखडा तयार करण्याचं काम महासंघ सध्या करत असल्याचं पाटील यांनी सांगितलं.

**<u>नीट</u>**

वैद्यकीय आणि दंत वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीटमध्ये पेपरफुटी आणि अन्य गैरप्रकार झाल्याचा आरोप करत, त्याची चौकशी केंद्रीय अन्वेषण संस्थेमार्फत करण्याची मागणी करणाऱ्या, विविध याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत. त्या संदर्भात न्यायालयानं राष्ट्रीय परीक्षा संस्था तसंच केंद्र सरकारला नोटिसा बजावल्या आहेत. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या सुट्टीतील पीठाने सीबीआय आणि बिहार राज्य सरकारकडूनही उत्तर मागितलं असून त्याकरता दोन आठवड्यांची मुदत दिली आहे.

**<u>अभ्यासक्रम</u>**

शिक्षण प्रसारक मंडळी संस्थेच्या पुण्यातील सर परशुरामभाऊ महाविद्यालयात पुढील महिन्यापासून बी ए नागरी सेवा हा 4 वर्षांचा स्वतंत्र पदवी अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष एस. के. जैन यांनी काल पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. नागरी आणि संरक्षण सेवांमध्ये जाऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याचा मोठा फायदा होणार असल्याचं जैन यांनी सांगितलं. हा अभ्यासक्रम नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून असून विद्यार्थ्यांना एकाच वेळी दोन पदव्या घेणे शक्य होणार आहे.

**<u>मिफ</u>**

मिफ अर्थात मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आजपासून मुंबईत सुरू होणार आहे. महोत्सवातले चित्रपट यंदा पहिल्यांदाच मुंबईसह पुणे, दिल्ली, कोलकाता आणि चेन्नईमध्ये दाखवले जाणार आहे. 21 जूनपर्यंत चालणाऱ्या या महोत्सवासंदर्भात अधिक जाणून घेऊया आमच्या मुंबई प्रतिनिधींकडून...

**यंदाच्या मिफमध्ये 59 हून देशातल्या 61 भाषांमधले 1 हजारांहून अधिक चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांच्या प्रवेशिका आल्या होत्या. पहिल्यांदाच या महोत्सवासाठी एवढ्या मोठ्या संख्येनं प्रवेशिका आल्या आहेत. त्यातल्या 314 चित्रपटांचा समावेश चित्रपट महोत्सवात झाला आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धा श्रेणीत 25 आणि राष्ट्रीय स्पर्धा श्रेणीत 77 चित्रपट आहेत. मिफमध्ये 8 जागतिक प्रीमियर, 5 आंतरराष्ट्रीय प्रीमियर, 18 आशिया प्रीमियरही होणार आहेत. अमृत काळातला भारत या विषयावरच्या चित्रपटांसाठी यंदाच्या महोत्सवात विशेष स्पर्धा आयोजित केली आहे. कान चित्रपट महोत्सवात सर्वोत्कृष्ट पारितोषिक मिळालेला लघुपट 'Sunflowers were the first ones to know' मिफमध्ये दाखवला जाईल. या व्यतिरीक्त पुण्यातल्या राष्ट्रीय चित्रपट संग्रहालयानं पुनरुज्जीवित केलेल्या काही चित्रपटांचं प्रदर्शन हे यंदाच्या महोत्सवाचं विशेष आकर्षण आहे. रशिया, बेलारुस, जपान, इटली, इराण, व्हिएतनाम आणि माली या देशांतल्या चित्रपटांचं विशेष पॅकेज यंदाच्या मिफमध्ये आहे. चित्रपट, लघुपट आणि माहितीपटांच्या व्यतिरीक्त देशविदेशातल्या तज्ञांचे मास्टरक्लास, चर्चासत्र हे ही यंदाच्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं वैशिष्ट आहे. मिफ हा दक्षिण आशियातला लघुपट, माहितीपट आणि ॲनिमेशनपटांसाठीचा सर्वात जुना आणि मोठा चित्रपट महोत्सव आहे. 1990 पासून दर दोन वर्षांनी हा महोत्सव मुंबईत आयोजित केला जातो.**

**यामुळं जगभरातल्या माहितीपट निर्मात्यांना एक व्यासपीठ उपलब्ध होतं. आकाशवाणी बातम्यांसाठी मुंबईहून जीवन भावसार**

**मेळघाट-अमरावती**

अमरावती जिल्ह्यातल्या मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू आणि मातामृत्यू या आरोग्यविषयक समस्या कायमस्वरुपी सोडवण्यासाठी प्रशासनाकडून विशेष मोहिम राबविण्यात येणार असल्याचं विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी म्हटलं आहे. विशेष चौकशी पथकाकडून, धारणी तालुक्यातील गर्भवती महिला आणि तिच्या बालकाच्या मृत्यूची, चौकशी केली जात असून दोषींवर कारवाई करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

**पवार उजनी-सोलापूर**

सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरणातल्या जलपर्यटना बरोबरच कृषी आणि धार्मिक पर्यटनाला ही मिळणार गती मिळणार आहे. उजनी पर्यटनाचा सविस्तर प्रस्ताव एमटीडीसी कडून मंत्रीमंडळाकडे आल्यास त्यासाठी तात्काळ शंभर कोटी रुपयांची तरतुद करु असा विश्वास उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे. पुण्यात काल झालेल्या बैठकीत सोलापूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाचं प्रात्यक्षिक उपमुख्यमंत्र्यांना दाखवलं. पवार यांनी या प्रस्तावाचं  स्वागत केलं.

**पेरणी-बीड**

यंदा मान्सूनचे वेळेवर आगमन झाल्याने बीड जिल्ह्यात शेतकऱ्यांनी बी-बियाणे खरेदी करत खरीपाच्या पेरण्यांना सुरुवात केली आहे. जिल्ह्यात 12 जून अखेरपर्यंत 5 टक्के पेरण्या पुर्ण झाल्या आहेत. सोयाबीनचे भाव पडल्याने यंदा शेतकऱ्यांनी कापूस आणि तूरीवर भर दिला आहे.

**निधन-अहमदनगर**

अहमदनगर जिल्ह्यातील आदर्श गाव हिवरे बाजार इथले राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक बनाभाई चांदभाई सय्यद यांचं काल वृद्धापकाळानं निधन झालं. ते 92 वर्षांचे होते. पंढरपूरच्या पांडुरंगाचे आणि संत ज्ञानेश्वरांचे ते निस्सीम भक्त होते, मुस्लीम समाजात जन्मलेले असूनही ते पंढरपूर, आळंदी, देहू नियमित वारी करत असत.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पाऊस पुढच्या चार ते पाच दिवसात राज्याच्या आणखी काही भागात दाखल होण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे. येत्या दोन दिवसात कोकणात बऱ्याच ठिकाणी पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं
# नमस्कार